प्रातःकाल
www. pratahkal.com

ठाणे क्लस्टर योजनेला गती; धोकादायक इमारतींतील नागरिकांच्या पुनर्वसनासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे निर्देश

ठाणे, दि. ०६ (वार्ताहर) : ठाणे शहरातील धोकादायक इमारतींमध्ये राहणाऱ्या नागरिकांना सुरक्षित आणि हक्काची घरे उपलब्ध करून देण्यासाठी क्लस्टर पुनर्विकास योजनेला गती देण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत. कोपरी, किसननगर आणि वागळे इस्टेट परिसरातील क्लस्टर प्रकल्प जलदगतीने पूर्ण व्हावेत यासाठी हे प्रकल्प महाप्रीतकडून महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडे हस्तांतरित करण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे. तसेच ठाणे जिल्ह्यातील महत्त्वाच्या क्लस्टर प्रकल्पांना 'अत्यावश्यक सार्वजनिक गृहनिर्माण प्रकल्प' घोषित करून त्यांची अंमलबजावणी वेगाने करण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला. उपमुख्यमंत्री शिंदे यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे ठाणे समूह विकास प्रकल्प आणि औद्योगिक विकास महामंडळाशी संबंधित विविध विषयांचा आढावा घेतला. यावेळी वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी, महानगरपालिका प्रशासन तसेच औद्योगिक विकास महामंडळाचे अधिकारी उपस्थित होते. ठाणे समूह विकास प्रकल्प हा देशातील सर्वात मोठ्या पुनर्विकास प्रकल्पांपैकी एक असल्याचे सांगत शिंदे यांनी हा प्रकल्प केवळ गृहनिर्माणापुरता मर्यादित नसून नागरिकांचे जीवनमान उंचावणारा आणि शहराचा नियोजित विकास साधणारा उपक्रम असल्याचे स्पष्ट केले.

ठाणे औद्योगिक विकास महामंडळाच्या सुमारे ६० हेक्टरहून अधिक जमिनीचे क्लस्टर पुनर्वसन प्रकल्पासाठी हस्तांतरण करण्याची प्रक्रिया वेगाने पूर्ण करण्याचे निर्देशही यावेळी देण्यात आले. या जमिनीच्या बदल्यात विकसित भूखंड परत देण्याचा प्रस्ताव असून त्यासंदर्भातील विविध प्रशासकीय आणि कायदेशीर बाबी निकाली काढण्याचे आदेश संबंधित विभागांना देण्यात आले. काही भूखंडांचे वाटप, आदिवासी पुनर्वसनासाठी राखीव भूखंडांचा प्रश्न, तसेच इतर प्रभावित घटकांच्या पुनर्वसनासंबंधी प्रलंबित विषय तातडीने सोडविण्याच्या सूचनाही करण्यात आल्या.

ठाणे, नवी मुंबई, कल्याण-डोंबिवली आणि वसई-विरार औद्योगिक विकास महामंडळ क्षेत्रातील जुन्या व धोकादायक इमारतींच्या पुनर्विकासासाठी क्लस्टर योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे. मात्र अनेक कारणांमुळे या प्रकल्पांना अपेक्षित गती मिळाली नसल्याचे निदर्शनास आले आहे. परिणामी हजारो नागरिक आजही जीव धोक्यात घालून जुन्या इमारतींमध्ये राहत आहेत. या नागरिकांचे तातडीने पुनर्वसन व्हावे आणि प्रकल्पांच्या अंमलबजावणीतील अडथळे दूर व्हावेत यासाठी विशेष उपाययोजना करण्याचे निर्देश बैठकीत देण्यात आले.

क्लस्टर पुनर्विकास योजना राबविताना पुनर्वसित नागरिकांसाठी तात्पुरत्या निवासाची व्यवस्था उपलब्ध करून देणे आवश्यक असल्याचे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी नमूद केले. त्यामुळे संक्रमणकालीन सदनिकांच्या उभारणीला प्राधान्य देण्याचे निर्देशही त्यांनी दिले. नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत ठाणे जिल्ह्यातील पुनर्विकास प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

ठाणे शहरातील वाढती लोकसंख्या, जुन्या इमारतींची दयनीय अवस्था आणि सुरक्षित निवासाची गरज लक्षात घेता क्लस्टर पुनर्विकास योजना महत्त्वपूर्ण मानली जात आहे. या प्रकल्पांच्या माध्यमातून हजारो कुटुंबांना सुरक्षित घरे, आधुनिक पायाभूत सुविधा आणि नियोजित नागरी विकासाचा लाभ मिळणार असून शहराच्या विकासालाही नवी दिशा मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

कोयना धरणाची पाणी पातळी घटली; बोट वाहतूक ठप्प, पर्यटन व्यवसायावर मोठा परिणाम

सातारा, दि. ०६ (वार्ताहर): महाराष्ट्राची भाग्यलक्ष्मी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कोयना धरणातील पाणीसाठा लक्षणीयरीत्या घटल्याने कोयना विभागातील जनजीवनावर मोठा परिणाम झाला आहे. शिवसागर जलाशयाची पातळी तळाच्या दिशेने गेल्याने बामणोली, तापोळा आणि शेंबडी परिसरातील बोट वाहतूक पूर्णपणे बंद पडली असून स्थानिक नागरिकांसह पर्यटन व्यवसायिकांनाही मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. कोयना धरणाची साठवण क्षमता सुमारे १०५ टीएमसी असून पावसाळ्यानंतर धरण पूर्ण क्षमतेने भरल्यावर परिसर निसर्गसौंदर्याने बहरून जातो. हिरवाईने नटलेले डोंगर, विस्तीर्ण जलाशय आणि बोटींमुळे येथे मोठ्या प्रमाणावर पर्यटन व्यवसाय फुलतो. मात्र एप्रिल-मे महिन्यांपासून पाण्याची पातळी घटू लागल्याने यंदाही शिवसागर जलाशयाचे स्वरूप पूर्णपणे बदलले आहे. पाणी आटल्यामुळे परिसर ओसाड आणि विराण दिसू लागला असून अनेक ठिकाणी जलाशयाचा तळ उघड झाला आहे. पाण्याची पातळी कमी झाल्याने कोयना विभागातील सुमारे १०५ गावांतील नागरिकांच्या दळणवळणावर परिणाम झाला आहे. पूर्वी जलमार्गाने सहज पोहोचता येणाऱ्या गावांतील नागरिकांना आता बामणोली व तापोळा बाजारपेठ गाठण्यासाठी मैलोनमैल पायपीट करावी लागत आहे. त्यानंतर सातारा किंवा महाबळेश्वरकडे पुढील प्रवास करावा लागत असल्याने नागरिकांची गैरसोय वाढली आहे. विशेषतः कांदाटी खोरे, सोळशी खोरे तसेच खरोशी-रेणोशी खोऱ्यातील रहिवाशांना या परिस्थितीचा अधिक फटका बसत आहे.

पर्यटन आणि बोट व्यवसाय हा या भागातील अनेक कुटुंबांच्या उदरनिर्वाहाचा प्रमुख आधार आहे. बोट वाहतूक बंद झाल्याने पर्यटन व्यवसाय जवळपास ठप्प झाला असून स्थानिक व्यावसायिकांचे आर्थिक नुकसान होत आहे. जलाशयाच्या काठावर उभ्या असलेल्या अनेक बोटी सध्या वापराविना उघड्यावर पडून आहेत. पर्यटकांची संख्या घटल्याने स्थानिक हॉटेल, निवास व्यवस्था आणि इतर पूरक व्यवसायांनाही फटका बसला आहे.

दरम्यान, जलाशयातील पाणी कमी झाल्याने अनेक वर्षांपासून पाण्याखाली गेलेली जुनी गावे, घरांचे अवशेष आणि मंदिरांचे भग्नावशेष पुन्हा उघड्यावर दिसू लागले आहेत. त्यामुळे पुनर्वसित गावांतील नागरिक आपल्या पूर्वीच्या गावांना भेट देत असून जुन्या वास्तू आणि मंदिरांचे दर्शन घेण्यासाठी परिसरात गर्दी होत आहे. या दुर्मीळ दृश्यांमुळे नागरिकांमध्ये भावनिक वातावरण निर्माण झाले असून अनेकजण आपल्या भूतकाळाच्या आठवणींना उजाळा देताना दिसत आहेत.

पावसाळा सुरू होऊन जलाशयात नव्याने पाण्याची आवक वाढेपर्यंत नागरिकांना आणि पर्यटन व्यवसायिकांना या परिस्थितीचा सामना करावा लागणार असल्याचे स्थानिकांकडून सांगण्यात येत आहे. स्थानिक प्रशासनाने पर्यायी वाहतूक व्यवस्था आणि आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

वादळी पावसामुळे नुकसानग्रस्त केळी पिकांची उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडून पाहणी

बारामती, दि. ०६ (वार्ताहर) : बारामती तालुक्यात शुक्रवारी झालेल्या वादळी पावसामुळे काऱ्हाटी परिसरातील केळी पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी नुकसानग्रस्त भागाला भेट देऊन शेतकऱ्यांशी संवाद साधला तसेच पीक नुकसानीची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडून परिस्थितीची माहिती घेत शेतकऱ्यांना लवकरात लवकर मदत मिळवून देण्याचे आश्वासन दिले.

नुकसानग्रस्त शेतांमध्ये भेटीदरम्यान उपमुख्यमंत्री पवार यांनी शेतकऱ्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. वादळी वाऱ्यांमुळे आणि पावसामुळे अनेक ठिकाणी केळीची झाडे जमीनदोस्त झाली असून उत्पादनावर मोठा परिणाम झाला आहे. या नुकसानीमुळे शेतकऱ्यांसमोर आर्थिक संकट उभे राहिले आहे. परिस्थितीची गांभीर्याने दखल घेत बाधित क्षेत्रांचे तात्काळ पंचनामे करण्याचे निर्देश जिल्हा प्रशासनाला देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी उपविभागीय अधिकारी उत्तम दिघे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी संजय काचोळे, तहसीलदार स्वप्नील रावडे, तालुका कृषी अधिकारी सचिन हाके तसेच स्थानिक शेतकरी आणि लोकप्रतिनिधी उपस्थित होते. प्रशासनाच्या माध्यमातून नुकसानीचा तपशील गोळा करण्याचे काम सुरू असून नुकसानभरपाईची प्रक्रिया वेगाने पूर्ण करण्यात येणार असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

उपमुख्यमंत्री पवार म्हणाल्या की, संकटाच्या काळात राज्य शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना योग्य मदत मिळावी यासाठी आवश्यक ती सर्व कार्यवाही करण्यात येत आहे. शेतकऱ्यांनी धीर न सोडता प्रशासनाशी समन्वय साधावा, असे आवाहनही त्यांनी केले.

यावेळी त्यांनी मौजे माळवाडी (लोणी) येथे २ जून रोजी झालेल्या वादळात मृत्यू झालेल्या नंदाबाई जनार्धन लडकत यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन सांत्वन केले. त्यांच्या कुटुंबीयांना चार लाख रुपयांच्या मदतीचा धनादेश सुपूर्द करण्यात आला. तसेच दोन शेळ्यांच्या नुकसानीपोटी आठ हजार रुपयांची मदत देण्यात आली. याशिवाय इतर नुकसानग्रस्त नागरिकांनाही शासनाकडून मंजूर करण्यात आलेल्या मदतीचे धनादेश प्रदान करण्यात आले.

तांबेवाडी तांड्यावर वनविभागाची धडक कारवाई; ३५ टन अवैध लाकूड जप्त

सोलापूर, दि. ०६ (वार्ताहर) : बार्शी तालुक्यातील तांबेवाडी तांडा येथे वनविभागाने धडक कारवाई करत सुमारे ३० ते ३५ टन अवैध लाकूडसाठा जप्त केला आहे. विनापरवाना वृक्षतोड करून साठवून ठेवण्यात आलेल्या लाकडाच्या या मोठ्या साठ्यामुळे परिसरात खळबळ उडाली असून वनविभागाने १२ ते १३ शेतकऱ्यांविरुद्ध महाराष्ट्र वृक्षतोड (नियमन) अधिनियम १९६४ अंतर्गत वनगुन्हे दाखल केले आहेत. वनविभागाला ३ जून रोजी तांबेवाडी तांडा परिसरातील काही शेतकऱ्यांनी त्यांच्या मालकीच्या क्षेत्रात तसेच घरांच्या परिसरात परवानगीशिवाय मोठ्या प्रमाणात वृक्षतोड केल्याची गोपनीय माहिती प्राप्त झाली होती. या माहितीची दखल घेत वनविभागाच्या पथकाने तातडीने छापा टाकून तपासणी केली. या कारवाईदरम्यान लिंब, आंबा, चिंच यांसारख्या विविध प्रजातींच्या वृक्षांची बेकायदेशीर तोड करून साठवून ठेवलेले मोठ्या प्रमाणातील लाकूड आढळून आले.

छाप्यामध्ये जप्त करण्यात आलेल्या लाकडाचे वजन अंदाजे ३० ते ३५ टन इतके असल्याचे प्राथमिक तपासात स्पष्ट झाले आहे. संबंधितांनी वृक्षतोडीसाठी आवश्यक असलेली कोणतीही कायदेशीर परवानगी घेतली नसल्याचेही वनविभागाच्या निदर्शनास आले. यानंतर संपूर्ण लाकूडसाठा जप्त करण्यात आला असून प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई सोलापूरचे उपवनसंरक्षक कुलराज सिंह आणि सहाय्यक वनसंरक्षक (रोहयो) अजित शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. बार्शीचे वनपरिक्षेत्र अधिकारी एस. एस. बडे यांनी मोहिमेचे नेतृत्व केले. यामध्ये वनपाल डी. बी. शिदोडकर, ए. आर. पिरजादे, वनरक्षक बालाजी धुमाळ, सचिन पुरी, करामत अली शेख, सुलतान शेख, पूजा खेणे, वनमजूर आशा बी. अन्सारी तसेच वाहन चालक सिद्धेश्वर जाधव आणि शाबाज मुल्ला यांनी सक्रिय सहभाग घेतला. दरम्यान, अवैध वृक्षतोड, बेकायदेशीर लाकूड वाहतूक आणि वन्यजीवांची शिकार हे गंभीर वनगुन्हे असल्याचे वनविभागाने स्पष्ट केले आहे. अशा प्रकारच्या बेकायदेशीर कृत्यांपासून दूर राहण्याचे आवाहन नागरिकांना करण्यात आले असून परिसरात अशा घटना आढळल्यास तात्काळ वनविभागाला माहिती देण्याचे आवाहनही करण्यात आले आहे. वृक्षसंवर्धन आणि पर्यावरण संरक्षणासाठी नागरिकांनी वनविभागाला सहकार्य करावे, असेही वनअधिकाऱ्यांनी नमूद केले.

अलीकडच्या काळात पर्यावरण संवर्धनाला अधिक महत्त्व प्राप्त झाले असताना अवैध वृक्षतोडीच्या घटनांवर कठोर कारवाई करण्याचा वनविभागाचा निर्धार असून अशा कारवायांमुळे वनसंपत्तीच्या संरक्षणाला बळ मिळणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

आचारसंहिता संपुष्टात; पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या विकासकामांना मिळणार गती

पिंपरी, दि. ०६ (वार्ताहर) : पुणे स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीची प्रक्रिया बिनविरोध पूर्ण झाल्याने लागू असलेली निवडणूक आचारसंहिता अधिकृतरीत्या संपुष्टात आली आहे. त्यामुळे पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या प्रशासकीय कामकाजावरील निर्बंध हटले असून सोमवारपासून महापालिकेचे कामकाज पूर्ण क्षमतेने सुरू होणार आहे. यामुळे प्रलंबित विकासकामे, धोरणात्मक निर्णय आणि विविध प्रशासकीय प्रस्तावांना गती मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

१८ मेपासून लागू असलेली आचारसंहिता मूळतः २५ जूनपर्यंत लागू राहणार होती. मात्र राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार विक्रम काकडे यांच्याविरोधात कोणताही उमेदवार मैदानात न उतरल्याने निवडणूक बिनविरोध झाली. त्यानंतर निवडणूक आयोगाने आचारसंहिता तत्काळ मागे घेण्याचा निर्णय घेतला. या निर्णयामुळे महापालिकेच्या विविध समित्यांच्या बैठका, विकास प्रकल्पांशी संबंधित प्रस्ताव आणि धोरणात्मक निर्णयांवरील अडथळे दूर झाले आहेत.आचारसंहितेमुळे रखडलेली अनेक कामे आता मार्गी लागण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. महापालिकेची मासिक सर्वसाधारण सभा १५ जून रोजी आयोजित करण्यात आली असून या सभेत अनेक महत्त्वपूर्ण विषयांवर निर्णय घेतले जाणार आहेत. यामध्ये १० स्वीकृत नगरसेवकांच्या नियुक्तीची प्रक्रिया, सुधारित प्रारूप विकास योजनेवरील सुनावणी समितीची स्थापना, मालमत्ता कर वसुलीसाठी प्रशासकीय विभागांची पुनर्रचना तसेच पुनावळे येथील जागा दीर्घ मुदतीच्या भाडेकराराने देण्यासंदर्भातील प्रस्तावांचा समावेश आहे.

याशिवाय १० जून रोजी स्थायी समितीची बैठकही होणार असून विविध विकासकामांशी संबंधित विषयांवर चर्चा अपेक्षित आहे. आचारसंहिता हटल्याने शहरातील पायाभूत सुविधा, नागरी सेवा आणि विकास प्रकल्पांना आवश्यक प्रशासकीय मंजुरी मिळण्यास वेग येणार असल्याचे महापालिका प्रशासनाकडून सांगण्यात आले. नगरसचिव उल्हास जगताप यांनी सर्व अडथळे दूर झाल्याने महापालिकेचे कामकाज नियमित आणि गतिमान पद्धतीने पुढे नेले जाईल, असा विश्वास व्यक्त केला.

भाजपचा संजय राऊत यांच्यावर पलटवार

संजय राऊत यांनी आयुष्यात कधीही आंदोलन केले नाही; भाजप प्रवक्ते नवनाथ बान यांचा खोचक टोला

मुंबई, दि. ०६ (प्रतिनिधी): महाराष्ट्र भाजपचे मुख्य प्रवक्ते नवनाथ बान यांनी शनिवारी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते संजय राऊत यांच्यावर तीव्र शब्दांत टीका केली आहे. नीट आणि सीबीएसई परीक्षांमधील कथित अनियमिततेविरोधात देशातील तरुणांना आंदोलनात सामील होण्याचे आवाहन करणाऱ्या संजय राऊत यांनी स्वतः आयुष्यात कधीही कोणत्याही आंदोलनात भाग घेतला नसल्याचा दावा बान यांनी केला. मुंबईतील भाजप प्रदेश कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना बान म्हणाले की, संजय राऊत यांनी कधीही कोणत्याही आंदोलनाचे नेतृत्व केले नाही किंवा ते शिवसेनेसाठी तुरुंगात गेले नाहीत. ते एकमेव वेळा तुरुंगात गेले ते पत्राचाळ घोटाळ्याच्या प्रकरणात होय. आता ते देशातील तरुणांना आंदोलनाचे आवाहन करत आहेत, त्यापेक्षा त्यांनी स्वतः भांडुपच्या गाढव नाका येथे जाऊन एकट्याने भव्य मोर्चा काढावा, असा खोचक टोला त्यांनी लगावला. नीट पेपरफुटी प्रकरणातील सर्व दोषींना सीबीआयने अटक केली असून केंद्र सरकार या प्रकरणी अत्यंत सतर्क आहे. संजय राऊत यांना केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या राजीनाम्याची मागणी करण्याचा कोणताही अधिकार नाही, कारण पालघरमध्ये हिंदू साधूंची हत्या झाली तेव्हा ते गप्प होते आणि त्यांनी तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या राजीनाम्याची मागणी केली नव्हती. महाविकास आघाडी सरकार कोसळल्याने आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या लोकप्रियतेमुळे राऊत यांना पोटशूळ उठला असून त्यांनी नितेश राणे यांनी पाठवलेले बनाँल औषध आपल्या जखमांवर लावावे, अशी टीकाही त्यांनी केली.

I AM CHANGING MY NAME FROM DHRUV RAVINDRA SINGH TO DHRUV RABINDRA PRATAP SINGH FOR PASSPORT ISSUANCE

मुंबई-पुणे महामार्गावर खारघर परिसराजवळ एका महिलेचा मृतदेह संशयास्पद स्थितीत सापडल्याने खळबळ

मुंबई, दि. ०६ (प्रतिनिधी) : मुंबई-पुणे महामार्गाजवळ एका अज्ञात महिलेचा मृतदेह अत्यंत संशयास्पद स्थितीत आढळून आल्याने परिसरात खळबळ उडवून दिली आहे. नवी मुंबई परिसरातील खारघर जवळ हा मृतदेह नागरिकांना आढळून आला, ज्याची माहिती तात्काळ स्थानिक पोलिसांना देण्यात आली. या महिलेचा मृत्यू नेमका कसा झाला, याचे कारण अद्याप समजू शकलेले नाही. मृत्यूचे नेमके कारण शोधण्यासाठी पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन तो उत्तरीय तपासणीसाठी म्हणजेच शवविच्छेदनासाठी स्थानिक शासकीय रुग्णालयात पाठवला आहे. यासोबतच सदर महिलेची ओळख पटवण्याचे प्रयत्न पोलिसांकडून युद्धपातळीवर सुरू आहेत.

जाहिर नोटीस

१. श्री. मोहम्मद गुलझार अन्सारी (अर्जदार) कासम नगर झोपडपट्टी, न्यू लिंक रोड, लक्ष्मी इंडस्ट्रिज जवळ, अंधेरी (प) मुंबई-५८
२. लल्लन हरीजन (मूळ झोपडीधारक) (अर्जदार यांचेमार्फत)
३. अध्यक्ष / सचिव कासम नगर झोपडपट्टी, न्यू लिंक रोड, न्यू लिंक रोड, अंधेरी (प) मुंबई-५८
४. विकासक, शिव इंफ्रा व्हिजन प्रा.लि., १ ला मजला आर. सी. हाऊस, द ग्रँड रेसिडेन्सी, शितल सिनेमाजवळ, एल.बी.एस . मार्ग, कुर्ला (प), मुंबई-७०

विषय :- सुनावणीस हजर राहणेबाबत.

अभय योजनेअंतर्गत हस्तांतरण / खरेदी विक्री करणाऱ्या झोपडीधारकांच्या सुनावणीबाबत.

संदर्भ :- १) शासन, गृहनिर्माण विभाग यांचेकडील निर्णय क्र.विसआ-२०२३/प्र.क्र.१५९/झोपनि-२, दि.०१/१०/२०२४

२) अर्जदार **श्री. मोहम्मद गुलझार अन्सारी** यांनी या कार्यालयास सादर केलेले जोडपत्र-२ दि. २७/०४/२०२६

मौजे-आंबिवली, ता. अंधेरी, न.भू.क्र.८२५, या मिळकतीवरील कासम नगर सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या पुरवणी परिशिष्ट-II मधील पात्र अ.क्र. २४० वरील झोपडीधारक लल्लन हरीजन यांचे नावे असलेली (निवासी) झोपडी अर्जदार श्री. मोहम्मद गुलझार अन्सारी यांनी खरेदी केल्याचे नमूद केले असून, संदर्भ क्र.१ मध्ये नमूद शासन निर्णयानुसार अभय योजनेअंतर्गत पात्रता ठरवणेकामी संदर्भ क्र.२ अन्वये जोडपत्र प्राप्त झाले आहे, त्याअनुषंगाने सदर प्रकरणी श्री. मोहम्मद गुलझार अन्सारी (अर्जदार) यांनी लल्लन हरीजन (मूळ झोपडीधारक) यांचे नाव वगळून आपले नाव अभय योजनेअंतर्गत समाविष्ट करणेसाठी या कार्यालयात अर्ज केला आहे. तरी उक्त प्रकरणात **दिनांक -१२/०६/२०२६ रोजी दुपारी ०३:३० वाजता** निम्न स्वाक्षरीकार (सक्षम प्राधिकारी ३ झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बृहन्मुंबई एच.डी.आय.एल. टॉवर, अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०००५१) यांच्या दालनात सुनावणी ठेवण्यात आली आहे. सबब, सदर प्रकरणात कायदेशीर हितसंबंध असणाऱ्या व्यक्तींनी नमूद दिवशी व वेळी आवश्यक त्या कायदेशीर पुराव्यांसह /कागदपत्रांसह आपण अथवा आपल्या लेखी प्राधिकृत प्रतिनिधीमार्फत सुनावणीस उपस्थित रहावे व म्हणणे सादर करावे. आपण वरील दिवशी व वेळी सुनावणीस गैरहजर राहिल्यास आपणास काहीही सांगावयाचे नाही, असे गृहीत धरुन नियमानुसार कार्यवाही करणेत येईल, याची कृपया नोंद घ्यावी.

सुनावणी दि. १२/०६/२०२६
वेळ ३:३० वाजता
स्थळ - सक्षम प्राधिकारी -३
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण
एच. डी. आय. एल. टॉवर वांद्रे (पू) मुंबई ४०० ००५१
(स्वाक्षरीत)
सक्षम प्राधिकारी - ३
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बृहन्मुंबई

NOTICE

NOTICE is hereby given that the Certificate (s) for 200 Equity Shares for bearing certificates. No(s) 205604, 205604, 205604, 205604, 205605, 205605, 205605 and Distinctive Nos. 43531-43570, 2594940-2594940, 3688182-3688207,10959592-10959624, 4629222- 4629256, 6169125-6169170, 10959625-10959643 under the folio No 2236111 of **LINDE INDIA LIMITED** standing in the name (s) of HANUMAN LAL LUNIA has/have been lost or mislaid and the undersigned has / have applied to the Company to issue duplicate Certificate(s) for the said shares. Any person who has any claim in respect of the said shares should write to our Registrar, KFin Technologies Limited. Selenium Tower B, Plot 31-32, Gachibowli, Financial District, Hyderabad-500032 within one month from this date, else the company will proceed to issue duplicate Certificate(s).

HANUMAN SINGH LUNIA
Name(s) of Shareholder(s)

Date: 05-06-2026

जाहीर सूचना

मयत सदस्याचे शेअर्स आणि स्वास्थ्य हस्तांतरीत करण्यासाठी सूचना, दावे आणि आक्षेप आमंत्रित करण्याबाबत

ही जाहीर सूचना माझ्या अशिल श्रीमती विंदा गुरुनाथ पडते, यांच्यावतीने जारी करण्यात आली आहे. माझे अशिल श्रीमती विंदा गुरुनाथ पडते व त्यांचे पती श्री गुरुनाथ आर. पडते, यांनी फ्लॅट नं. ३०२, बी-विंग, ३ रा मजला, धर्मराज कृपा को. ऑप. हौ. सोसा. लि., क्षेत्रफळ ७३० चौरस फुट, मानपाडा रोड, अयोध्या नगरी, स.नं. १०, हि.नं. ७ / १ (पार्ट), ८ (पार्ट), गाव-गजबंधन पाथर्ली, डोंबिवली (पू), ता- कल्याण, जिल्हा- ठाणे ४२१२०१, हा फ्लॅट दिनांक २५/०८/२००४ रोजी कलन- ४ यांच्या कार्यालयातून दस्त क्र. ३५५०/२००४ अन्वये मे. चिराग असोशिएट्स तर्फे प्रविण जे नंदू यांचेकडून खरेदी केला.

श्रीमती विंदा गुरुनाथ पडते व श्री गुरुनाथ आर. पडते, यांच्या नावे सोसायटी शेअर सर्टीफिकेट क्र. २४, नंबर २३१ ते २४० (एकूण १०) आहेत

तथापि, कै. श्री गुरुनाथ आर. पडते यांचे दिनांक २६/०७/२०२० रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात खालील व्यक्ती हेच त्यांचे एकमेव कायदेशीर वारसदार म्हणून उरले आहेत : (१) श्रीमती विंदा गुरुनाथ पडते - पत्नी, (२) श्री. अनुप गुरुनाथ पडते - मुलगा. वरील दोन व्यक्तींव्यतिरिक्त, सदर मृत व्यक्तींचे अन्य कोणतेही कायदेशीर वारसदार नाहीत.

आता माझ्या अशिलाला वरील नमूद केलेला 'फ्लॅट क्रमांक नं- बी / ३०२' ची विक्री करणेची आहे सबब या नोटीसद्वारे असे जाहीर करण्यात येत आहे की,

वरील मालमत्तेच्या संदर्भात कोणत्याही व्यक्तीचा कोणताही हक्क, दावा, विनिमय, गहाण, बक्षीसपत्र, विश्वस्त व्यवस्था, वारसाहक्क, कौटुंबिक व्यवस्था, बोजा, तारण इत्यादी कोणत्याही स्वरूपाचा हितसंबंध असल्यास; तसेच वरील फ्लॅटच्या संदर्भात कोणत्याही व्यक्तीचा/व्यक्तींचा काही आक्षेप असल्यास, त्यांनी सदर आक्षेप लेखी स्वरूपात, त्यास पुष्टी देणाऱ्या कागदोपत्री पुराव्यांसह आणि दाव्याशी संबंधित कागदपत्रांच्या प्रमाणित प्रतींसह, ही नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून पंधरा (१५) दिवसांच्या आत, खाली नमूद केलेल्या पत्त्यावर स्वाक्षरी करणाऱ्या व्यक्तीस (अधोस्वाक्षरी करणाऱ्यास) कळवावा. जर वरील नमूद केलेल्या मुदतीमध्ये कोणताही प्रतिसाद प्राप्त झाला नाही, तर असे गृहीत धरले जाईल की, या प्रकरणी कोणाचेही काहीही म्हणणे नाही आणि कोणताही दावा मान्य केला जाणार नाही; तसेच माझ्या अशिलाला वरील नमूद केलेला 'फ्लॅट क्रमांक - बी / ३०२' विक्री करण्याचा पूर्ण अधिकार (स्वातंत्र्य) असेल.

दिनांक :-०७/०६/२०२६

सही/-
(ॲड. नयना एस. शेरे)
वकील उच्च न्यायालय,
सी / ७६, कस्तुरी प्लाझा, मानपाडा रोड, डोंबिवली (पू) **मोबा. : ७७१०९६९९८०.**

बँक ऑफ़ बड़ौदा
Bank of Baroda

बँक ऑफ बडोदा
नवी मुंबई प्रादेशिक कार्यालय: ४०५, चौथा मजला, प्लॅटिनम टेक्नो पार्क, कर्नाटक भवनसमोर, रघुलीला मॉलच्या मागे, वाशी - ४००७०२.
ई-मेल: recovery.navimumbai@bankofbaroda.co.in

स्थावर मालमत्ता आणि चल मालमत्तांच्या विक्रीसाठी विक्री सूचना - परिशिष्ट IV-A [नियम ८(६) आणि ६(२) मधील तरतुदी]

सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अधिनियम, २००२ अंतर्गत स्थावर मालमत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना, सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ मधील नियम ८(६) आणि ६(२) च्या तरतुदीसह वाचावी.

सर्वसामान्य जनतेस आणि विशेषत: कर्जदार/हमीदार यांना याद्वारे सूचना देण्यात येते की खाली वर्णन केलेल्या, सुरक्षित धनकोकडे गहाण/भारित केलेल्या स्थावर मालमत्तेचा ताबा बँक ऑफ बडोदा, सुरक्षित धनकोचे अधिकृत अधिकारी यांनी घेतला असून, ती खाली नमूद खात्यांच्या वसुलीसाठी "जशी आहे तशी", "जेथे आहे तेथे" आणि "जे काही आहे ते" या आधारावर विकली जाणार आहे. कर्जदार/हमीदार/सुरक्षित मालमत्ता/देय रक्कम/राखीव किंमत/ई-लिलावाची तारीख व वेळ, ईएमडी आणि बोली वाढ रक्कम यांचा तपशील खाली नमूद आहे:-

अ. क्र.	कर्जदार/हमीदार यांचे नाव व पत्ता	ज्ञात भारांसह स्थावर मालमत्तेचे वर्णन, असल्यास	एकूण देय रक्कम	ई-लिलावाची तारीख व वेळ	(१) राखीव किंमत व (२) मालमत्तेच्या ईएमडीची रक्कम (३) बोली वाढ रक्कम	ताब्याची स्थिती (रचनात्मक/ प्रत्यक्ष)	मालमत्ता पाहणीची तारीख व वेळ/संपर्क व्यक्ती
१.	**कर्जदार: श्री. संदीप बाळू शिरवळे** **सह-कर्जदार: सौ. जयश्री संदीप शिरवळे** पत्ता: आशीर्वाद सोसायटी, अंतोरा रोड, एस टी स्टँडच्या मागे, पेण, रायगड-४०२१०७	गहाण मालमत्तेचा सर्व खंड आणि भूखंड ज्याचे समन्यायी तारण जे राधाकृष्ण अपार्टमेंटमधील तिसऱ्या मजल्यावरील फ्लॅट क्र. ३०२, बांधकाम क्षेत्र ५०३.१२ चौ. फूट, देवोनगरी, पेण, जिल्हा-रायगड-४०२१०७, येथे स्थित आहे. **बँकेला ज्ञात भार: ज्ञात नाही**	रु. ३३,२८,२६२/- दिनांक ३१.०५.२०२६ पर्यंत, तसेच त्यावरील इतर शुल्क	२२.०६.२०२६ दुपारी ०२.०० ते सायं. ०६.००	१) रु. २३,९५,०००/- २) रु. २,३९,५००/- ३) रु. १०,०००/-	प्रत्यक्ष	१८.०६.२०२६ सकाळी ११.०० ते दुपारी ०२.०० श्री. चंद्रशेखर – ९६१८६४९३४५
२.	**कर्जदार: सौ. नम्रता नारायण कारले** पत्ता: घर क्र. ६१७, एमआयडीसी रोड, हनुमान मंदिर, शिवाजी नगर, अंबरनाथ, ठाणे, ४२१५०१.	गहाण मालमत्तेचा सर्व खंड आणि भूखंड ज्याचे समन्यायी तारण जे गाव नेरळमधील न्यू सर्व्हे क्र. ४४२, प्लॉट क्र. १३, सर्व्हे क्र. ४१२, प्लॉट क्र. १३, जुना सर्व्हे क्र. ३०/१